MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED
महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या
(A Government of Maharashtra Undertaking)
( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

**Dadasaheb Phalke Chitranagari (दादासाहेब फाळके चित्रनगरी ) गोरेगाव पूर्व, मुंबई**
Filmcity, Mumbai
https://filmcitymumbai.org

---

## काळा घोडा महोत्सव

काळा घोडा महोत्सवात येणाऱ्या चोखंदळ आणि हौशी प्रेक्षकांसाठी नेहमीच विविध कलाकृती सादर केल्या जातात. यावर्षी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या वतीने महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या संकल्पनेतून  प्रत्येक कलाकाराच्या कलेचा गौरव करणाऱ्या लंबी रेस का घोडा या संकल्पनेवर आधारित सिल्वर स्क्रीन सिनेमॅटिक घोडा तयार करण्यात आला आहे. या निर्मितीला राज्याचे सांस्कृतिक मंत्री श्री.आशिष शेलार यांनी भेट देऊन महामंडळाने अशा प्रकारच्या कलात्मक उपक्रमात सहभाग दर्शविल्या बद्दल कौतूक केले.

या महोत्सवाचे यंदाचे २५ वे वर्ष असून महामंडळाने यंदा पहिल्यांदाच सहभाग नोंदवला आहे. आजच्या पहिल्याच दिवशी सिनेमॅटिक घोड्यासोबत फोटो काढण्यासाठी कलाप्रेमींनी गर्दी केली होती. हा उपक्रम यशस्वीकरण्यासाठी महामंडळाच्या वित्तीय सल्लागार मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे यांनी विशेष मेहनत घेतली.